**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन, पश्चिम बंगाल, सिक्किम आणि बिहारमधे विकासाकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी

- मेक इन इंडिया हे निर्णायक धोरण असून त्यामुळे भारत भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असा संरक्षण मंत्र्यांचा विश्वास

- विकसित कृषी संकल्प अभियानाला राज्यासह देशभरात सुरुवात

- देशातलं अन्नधान्य उत्पादन ३५ कोटी ४० लाख टनापर्यंत पोहोचण्याचा अंदाज

आणि

- दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत अडथळ्यांच्या शर्यतीत भारताच्या अविनाश साबळेला सुवर्णपदक

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि बिहार या राज्यांमधल्या विविध विकासकामांचं उदघाटन आणि पायाभरणी केली.

प्रधानमंत्री मोदी यांनी आज सकाळी दूरस्थ पद्धतीनं सिक्कीम मधल्या विविध विकास प्रकल्पांचं उदघाटन आणि पायाभरणी केली. सिक्कीमसह ईशान्येकडचा संपूर्ण प्रदेश भारताच्या प्रगतीचा तेजस्वी अध्याय म्हणून उदयाला येत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

त्यानंतर त्यांनी पश्चिम बंगालमध्ये अलीपुरद्वार जिल्ह्यात शहर आधारित गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी केली. या प्रकल्पासाठी १ हजार १७ कोटी रुपये खर्च झाले असून, पश्चिम बंगालमधल्या अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यातल्या नागरिकांना त्याचा लाभ

मिळेल. या प्रकल्पाद्वारे  घरोघरी स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा होईल. विकसित भारताचं स्वप्न पश्चिम बंगालच्या विकासाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**- होल्ड बाईट- प्रधानमंत्री -**

त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी बिहारला भेट दिली. बिहारमधल्या जयप्रकाश नारायण आंतरराष्ट्रीय पटना विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन त्यांनी केलं. सुमारे १२०० कोटी रुपये खर्चाच्या या नवीन टर्मिनल इमारतीमुळे विमानतळाची वार्षिक प्रवासी हाताळणी क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. प्रधानमंत्र्यांनी बिहता विमानतळाच्या नवीन नागरी भागाची पायाभरणी देखील केली, हा प्रकल्प १ हजार ४१० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचा आहे. यावेळी बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, मुख्यमंत्री नितीश कुमार, नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू उपस्थित होते. उदघाटन समारंभानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी पाटणा इथं रोड शो मध्ये भाग घेतला.

प्रधानमंत्री मोदी उद्या रोहतास जिल्ह्यातल्या  बिक्रमगंज इथं  भेट देतील. यावेळी ते ते ४८ हजार ५२० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचं  उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण करतील.
त्यानंतर ते उत्तर प्रदेशला भेट देणार असून, कानपूर नगर इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील.

**<><><><><>**

मेक इन इंडिया हे देशासाठी निर्णायक धोरण असून, जपान प्रमाणे, भारतही भविष्यातल्या तंत्रज्ञानाचं विकास केंद्र बनू शकतो, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं CII, अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. देशाच्या सुरक्षा आणि समृद्धीसाठी ‘मेक इन इंडिया’ महत्वाचं असून ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशवासीयांनी या मोहिमेचं यश अनुभवल्याचं ते यावेळी म्हणाले.

संपूर्ण जगात आज अनिश्चिततेचं वातावरण असून, विश्वासाचा अभाव हे त्याचं मूळ कारण आहे. या पार्श्वभूमीवर, देशाचे विविध प्रदेश, समुदाय आणि आर्थिक घटकांमध्ये

विश्वासाचं मजबूत वातावरण निर्माण करण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचं राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

<><><><><>

पहिली भारतीय बनावटीची सेमी कंडक्टर चिप यावर्षी बाजारात आणली जाईल, अशी घोषणा माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. ते CII अर्थात भारतीय उद्योग महासंघाच्या वार्षिक व्यवसाय परिषदेला संबोधित करत होते. या चिपचा उपयोग ऑटोमेटिव्ह, टेलिकॉम तसंच ट्रेनमध्ये वापरली जाते.

<><><><><>

डोंगराळ प्रदेशांमध्ये दरड कोसळण्याच्या घटना रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची गरज केंद्रीय रस्ते वागतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नवी दिल्लीत डोंगर उतारांचं स्थिरीकरण आणि दरडी कोसळण्याला प्रतिबंध या विषयावर आयोजित परिषदेत बोलत होते. तंत्रज्ञानातली प्रगती ही प्रवाही गोष्ट आहे आणि तज्ञांनी समस्या ओळखून योग्य उपाययोजना सुचवली पाहिजे, असं ते म्हणाले.

<><><><><>

महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांनी आज राजभवन इथं महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. त्यावेळी राजभवनातले अधिकारी, कर्मचारी आणि पोलिस दलातले अधिकारी तसंच कर्मचारी उपस्थित होते.

<><><><><>

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ या देशव्यापी अभियानाला आज ओदिशात पुरी जिल्यातल्या साक्षीगोपाल इथून सुरुवात झाली. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी यांनी ‘एक पेड माँ के नाम’ या देशव्यापी मोहिमेसाठी एक रोप लावून अभियानाचं उद्घाटन केलं.

विकसित कृषी संकल्प अभियानाच्या माध्यमातून कृषी संशोधक आणि कृषी अधिकारी देशभरातल्या सातशे जिल्ह्यातल्या दीड कोटी शेतकऱ्यांशी संवाद साधतील आणि त्यांना कृषी क्षेत्रातल्या आधुनिक संशोधनाबाबत माहिती देतील. या अभियानाच्या

माध्यमातून तज्ज्ञांची २ हजार १७० पथकं देशातल्या ७२३ जिल्ह्यांमधल्या ६५ हजारपेक्षा जास्त गावांना भेट देणार आहेत. यात किमान चार वैज्ञानिक असतील. या अभियानाद्वारे देशातल्या सव्वा कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचं लक्ष्य ठेवण्यात आलं आहे.

“समृद्ध कृषक योजनेतून सरकार शेतकऱ्यांकडून प्रति क्विंटल ३ हजार शंभर रुपये दराने धान खरेदी करत आहे. हा दर धानाच्या हमी भावापेक्षा आठशेनं जास्त आहे”, असं केंद्रीय कृषीमंत्र्यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितलं.

महाराष्ट्रात परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातून आज विकसित कृषि संकल्प अभियानाला सुरुवात झाली. चित्ररथाला हिरवा झेंडा दाखवून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अभियानाला सुरुवात केली. या अभियानाद्वारे शेतकऱ्यांना खरीप पिकाच्या नियोजनासाठी अचूक मार्गदर्शन मिळेल, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी मिळेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

<><><><><>

सन २०२४-२५ मधे भारताचं अन्नधान्य उत्पादन ३५ कोटी ४० लाख टनापर्यंत पोहोचण्याचा अंदाज सरकारनं वर्तवला आहे. हे उत्पादन २०२३-२४ पेक्षा ६ टक्क्याहून जास्त आहे. गहू, तांदूळ, मका, सोयाबीन, डाळी आणि शेंगदाणा या प्रमुख पिकांचा यात समावेश आहे. तांदूळ १ हजार ४९० लाख मेट्रिक टन, गहू १ हजार १५७ लाख मेट्रिक टन तसंच भरड धान्यामधे ५४ लाख मेट्रिक टनाची वाढ झाली आहे.

अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत आहे, मात्र डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनाचा वेग वाढवण्याची गरज आहे, असं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. सरकारने शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केली तसंच खत वेळेवर उपलब्ध करून दिलं, त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली, असं चौहान म्हणाले.

<><><><><>

**आशियाई ॲथलेटिक्स /सुनील**

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेनं आज तीन किलोमीटर अडथळ्याच्या शर्यतीत सुवर्ण पदक पटकावलं.

अवघ्या आठ मिनिट २० सेकंद आणि ९२ मिनी सेकंदात त्यानं ही शर्यत पूर्ण केली. यापूर्वी २०१९ मध्ये दोहा इथं झालेल्या स्पर्धेत अविनाश साबळेनं रौप्य पदक पटकावलं होतं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतली पात्रता फेरीतली पहिली लढत पंजाबमधे मोहाली इथं पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. पंजाब किंग्जची फलंदाजी गडगडली असून, शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पंजाब किंग्जच्या ७ षटकात ५ बाद ५२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

दहशतवादाविरोधातील भारताच्या लढ्याची माहिती देण्यासाठी देशोदेशी गेलेली सर्वपक्षीय शिष्टमंडळ सध्या त्या त्या देशातल्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करत आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दक्षिण अफ्रिकेतील संसदेतल्या सदस्यांशी चर्चा केली. अफ्रिकन कॉंग्रेसच्या सदस्यांचं नेतृत्व सेक्रेटरी जनरल फिकेले मेब्यूला यानी केलं. यावेळी त्यांनी भारताच्या कठोर भूमिकेचं स्वागत केलं असून दहशतवादाचा निषेध केला. शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील पथकानं पनामा इथं भारताची भूमिका मांडली. तर भाजपा खासदार रवीशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील पथक डेन्मार्क इथं पोहोचलं आहे.

<><><><><>

वाढता आर्थिक राष्ट्रवाद आणि व्यापार शुल्कातल्या चढ-उतारामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेचे नकारात्मक पडसाद जागतिक आर्थिक स्थितीमधून उमटत असल्याचं जागतिक आर्थिक मंचाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटलं आहे.

//<><><><><>//